महाराष्ट्र शासन

**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**

मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☏२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☏२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक:-डब्ल्यूईबी-१०२०/सीआर-२६/२०२१/मा.तं. दिनांक:- ९ फेब्रुवारी, २०२२

# -: प्रसिध्दीपत्रक:-

**विषय:-सहायक सरकारी अभियोक्ता, गट अ -चलनाद्वारे परीक्षा शुल्काचा भरणा करण्यास मुदतवाढ**
**संदर्भ:- जाहिरात क्रमांक ००१/२०२२, दिनांक ७ जानेवारी, २०२२.**

विषयांकित संवर्गातील पदभरतीसाठी संदर्भिय दिनांक ७ जानेवारी २०२२ रोजी प्रसिध्द जाहिरातीस अनुसरुन चलनाद्वारे परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरीता निश्चित अंतिम दिनांकास म्हणजेच दिनांक ७ फेब्रुवारी, २०२२ रोजी राज्य शासनाकडून सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आली होती. त्यामुळे भारतीय स्टेट बँकेसह सर्व सरकारी बँक/कार्यालये बंद असल्याच्या कारणास्तव अर्ज करणाऱ्या उमेदवारांना चलनाद्वारे परीक्षा शुल्काचा भरणा करणे शक्य झाले नाही. तसेच, विहित दिनांकानंतर चलनाची वैधता समाप्त होत असल्याने दिनांक ७ फेब्रुवारी, २०२२ नंतर उमेदवारांना चलनाद्वारे परीक्षा शुल्काचा भरणा करता आला नाही. यास्तव, विहित कालावधीत अर्ज सादर केलेल्या तथापि परीक्षा शुल्काचा भरणा करु न शकलेल्या उमेदवारांना परीक्षाशुल्काचा भरणा करण्याकरीता चलनाची प्रत प्राप्त करण्यास व बँकेमध्ये परीक्षा शुल्काचा भरणा करण्यास खालीलप्रमाणे मुदतवाढ देण्यात येत आहे:-

(१) चलनाची प्रत प्राप्त करण्यासाठीचा अंतिम दिनांक:- दिनांक १० फेब्रुवारी, २०२२ रोजी २३.५९ वाजेपर्यंत.

(२)चलनाद्वारे परीक्षा शुल्काचा भरणा करण्याचा अंतिम दिनांक:-दिनांक ११ फेब्रुवारी, २०२२ रोजी बँकेच्या कार्यालयीन वेळेत

२. यापूर्वी चलनाची प्रत प्राप्त करुन घेतली आहे. तथापि, सदर चलनाद्वारे परीक्षा शुल्काचा भरणा केला नाही; अशा उमेदवारांनी आयोगाच्या ऑनलाईन अर्जप्रणालीद्वारे चलनाची प्रत पुन्हा प्राप्त करुन घेऊन त्याद्वारे परीक्षा शुल्काचा भरणा करणे आवश्यक आहे.

३. उमेदवारांनी गैरसोय टाळण्यासाठी चलनाची प्रत प्राप्त करणे व भारतीय स्टेट बँकेच्या शाखेत परीक्षा शुल्काचा भरणा करणे यामध्ये किमान २ तासांचा कालावधी राहील, याची दक्षता घ्यावी.

सहसचिव, माहिती तंत्रज्ञान
महाराष्ट्र लोकसेवा आयोग